# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८५ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०२/२०१७

**१) महीलेस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २/२/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी यांचे प्रकरण मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली यांचे कोर्टात न्यायाप्रविष्ठ असुन यातील आरोपीने तनसीच्या ठिगाला काटया लावत असतांना त्यास फिर्यादीने हटकले असता त्याने फिर्यादीचे लज्जेस धोका पोहचेल अश्या ईरादयाने शब्द उच्चारुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन आपले हावभाव दाखवुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ५०९,२९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) लाच लुचपत प्रतिबंधक यांची कारवाई . :-**

दिनांक ०३/०२/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील आरोपी यांनी तक्रारदार रविन्द्र पंचमलाल असाटी वय ५० वर्ष, रा. गंगा बिल्डींग सिताराम सिटी भोजापुर भंडारा धंदा प्रो. पा. असाटी ईलेक्ट्रॉनीक सर्विसेस भंडारा यांना त्यांचे सन २०१५ मध्ये दलीतेत्तर योजने अंतर्गत लावण्यात आलेल्या एलईडी लाईटचे प्रलंबीत उर्वरीत ११,८२,६२१/–रु. चे बिल काढुन देण्याकरीता तसेच यापुर्वी काढुन दिलेल्या बिलाचे परसेंन्टेज असे एकत्ररित्या २,००,०००/–रु. स्वत:साठी व मुख्याधीकारी यांचे नावाने ५०,०००/–रु. लाचेची मागणी करुन त्यापैकी १,००,०००/–रु. आपले पदाचा स्वत:चे आर्थीक लाभाकरीता वाम व भष्ट मार्गाचा वापर करुन लाच रक्कम स्विकारतांना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ७,१३(१)(ड) सहकलम १३(२) लाच लुचपत प्रतिबंधक विभाग अन्वये येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. नी. पुल्लरवार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) सार्वजनीक ठिकानी वाहन उभे ठेवुन रहदारीस अडथडा निर्माण झाल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०३/०२/२०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील टाटा सुमो क्र. एमएच २६ एल ०७३० चा चालक ही आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी उभे करून येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भांदवी. मोवका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) अवैध दारू /जुगार अडयांवर धाडी . :-**

दिनांक ०३/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, मोहाडी, कारधा, सिहोरा, गोबरवाही व पवनी येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन ८० हातभट्टी दारु किंमती ६,९५०/–रु. व ०२ लिटर ३४० मिली लिटर देशी दारु किंमती ६७०/–रू तसेच जुगारातुन ३२,२१,१२०/–रु. असा एकुण किंमती ३,२९,७४०/–रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक ०३/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक ३ केसेस, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान-पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.